# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**परिपत्रक क्रमांक : २०४४६/मराठी भाषा समिती (ड-१७)**

**विधान भवन, मुंबई.**

**दिनांक : ३ ऑक्टोबर, २०२२.**

**संदर्भ :** मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र.वाप्रेदि-२०२२/प्र.क्र.७५/भाषा -३, दि. २६ सप्टेंबर, २०२२.

**:: <u>परिपत्रक</u> ::**

सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना कळविण्यात येते की, **माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम** यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक **१५ ऑक्टोबर** हा त्यांचा जन्मदिवस **"वाचन प्रेरणा दिन"** म्हणून साजरा करण्यात येतो. दिनांक १५ ऑक्टोबर, २०२२ रोजी शनिवार हा शासकीय सुट्टीचा दिवस असल्यामुळे या सचिवालयाच्या वतीने **शुक्रवार, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२** रोजी **<u>"वाचन प्रेरणा दिन"</u> मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे दु. ४.०० ते सायं ५.०० वा. या कालावधीत प्रत्यक्ष तसेच ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात येणार आहे.** सदर कार्यक्रमाचे प्रक्षेपण या सचिवालयाच्या https://www.youtube.com/c/MAHARASHTRALEGISLATURESECRETARIAT/Playlists या यु टयुब चॅनेलवर व "महाराष्ट्र विधानमंडळ मराठी भाषा समिती" या फेसबुक अकाऊंटवर करण्यात येणार आहे.

## :: कार्यक्रम ::

**शुक्रवार, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२**
**दुपारी ४.०० ते सायं. ५.०० वा.**
**स्थळ : मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई.**

| वेळ | कार्यक्रम | |
|---|---|---|
| दु.४.०० ते दु. ४.०५ वा. | *दीप प्रज्वलन* | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या शुभहस्ते |
| दु. ४.०० ते दु. ४.०५ वा. | *ग्रंथपूजन* | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या शुभहस्ते |
| दु.४.०५ ते दु.४.१० वा. | *स्वागत आणि प्रास्ताविक* | मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय |
| दु.४.१० ते दु. ४.१५ वा. | *भारताचे संविधान उद्देशिका-सामुहिक वाचन* | सभागृहात उपस्थित सर्व उद्दिशिकेचे सामुहिक वाचन करतील. |
| दु.४.१५ ते दु. ४.३० वा. | *तज्ञांचे मार्गदर्शन/ व्याख्यान* | सुप्रसिध्द कवयित्री व लेखिका नीरजा यांचे "सांस्कृतिक उभारणी आणि वाचनसंस्कृती" या विषयावरील व्याख्यान |
| दु. ४.३० ते दु. ४.५० वा. | *वाचनानुभव/ अभिवाचन/ कथाकथन/ काव्यवाचन इ.* | या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांचे सादरीकरण. |

| वेळ | कार्यक्रम | |
|---|---|---|
| दु.४.५० ते दु.४.५५ वा. | *कार्यक्रमाचे अध्यक्ष यांचे मार्गदर्शन* | **मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान** |
| दु.४.५५ ते सायं. ५.०० वा. | *आभार प्रदर्शन* | **डॉ.अनिल महाजन, सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी हे आभार प्रदर्शन करतील.** |

कार्यक्रमामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे नाव, पदनाम, कक्षाचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक या माहितीसह सादर करावयाचा वाचन प्रकार इत्यादी तपशील मराठी भाषा समिती (ड-१७) कक्षाकडे **दि. ७ ऑक्टोबर, २०२२ रोजीपर्यंत** सादर करावा.

कृपया **"वाचन प्रेरणा दिनाच्या"** उपरोक्त कार्यक्रमास सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवावा.

( रचना र.परब )
**कक्ष अधिकारी,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**प्रति :**

सर्व अधिकारी/कर्मचारी.

**याची प्रत :**

१. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद /महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
५. महाराष्ट्र विधानसभेचे/विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
७. कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, ग-२ कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
८. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.
९. विधिमंडळाची सर्व पक्ष कार्यालये.
१०. संगणक कक्ष (Website)
११. सुरक्षा विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
१२. अग्निशमन विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
१३. निवड नस्ती.

**टिप :** कार्यक्रमास सुरुवात होण्यापूर्वी भारताचे संविधानाच्या उद्देशिकेच्या प्रती आणि मराठी विश्वकोशासंदर्भातील माहितीच्या प्रती उपस्थित सर्वांना वितरीत करण्यात येतील.